**महाराष्ट्र शासन**
# सहसंचालक, (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर
**जुने मॉरिस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर ४४० ००१**
**Web : www.dirhe.in/jdnagpur**

E-Mail : jdhengp@rediffmail.com E-Mail : jdhengp@gmail.com

दुरध्वनी क्रमांक ०७१२-२५६१७१३ फॅक्स नं. ०७१२-२५५४२१०

जा.क्र. उशिनाग/से.नि./परिपत्रक/२०२५/ दिनांक

## *परिपत्रक*

**वाचा :-** १. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ दिनांक ११.०१.१९६५
२. महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ दिनांक १६.०७.२०२१
३. महाराष्ट्र स्थानिक प्रधिकरणे (राजभाषा) अधिनियम २०२२ दिनांक ०७.०४.२०२२
४. मराठी भाषा विभाग शा.नि. क्र. संकिर्ण-२०२२/प्र.क्र.६२/भाषा-२ दिनांक ०९.०५.२०२२

उपरोक्त संदर्भाधिन महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अन्वये महाराष्ट्र राज्याची राजभाषा म्हणून देवनागरी लिपीतील मराठी भाषेचा अंगीकार करण्यात आला आहे. प्रशासकीय कामकाजीतील मराठी भाषेची व्याप्ती वाढविण्याच्या अनुषंगाने प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेच्या वापराची प्रयोजने निश्चित करण्यासाठी आणि जनसंवाद व जनहीताशी संबंधित बाबीमध्ये शासकीय कार्यालयाकडून मराठी भाषेचा वापर करण्यात यावा. यासाठी ''महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम २०२१ दिनांक १६.०७.२०२१ रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला आहे.

प्रशासकीय कार्यालये आणि स्थानिक प्राधिकरणे यांच्या कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्याबाबतच्या तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही सर्व प्रशासकीय विभाग, शासकीय कार्यालये, तथा अशासकीय अनुदानित संस्था आणि स्थानिक प्राधिकरणे यांनी करण्याबाबत शासनाचे स्पष्ट आदेश असतांना सुध्दा बऱ्याचशे अनुदानीत महाविद्यालये, अकृषी विद्यापीठे, शारिरीक शिक्षण महाविद्यालये यांना वारंवार सुचना देवून सुध्दा असे निर्दशनास येते की, सहसंचालक (उच्च शिक्षण) यांचे कार्यालया सोबत इंग्रजीत पत्रव्यवहार करण्यात येतो. ही बाब शासन धोरणाचे विरोधात आहे.

करीता प्रशासकीय पत्रव्यवहार या पुढे मराठी भाषेतच करण्यात यावा. इंग्रजीत पत्रव्यवहार केल्यास पत्रासह प्रकरण परत करण्यात येईल. याची खबरदारी घ्यावी. याबाबत महाविद्यालय व अकृषी विद्यापीठातील कार्यरत/सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना अवगत करावे.

Signed by
Santosh Waghuji Chavan
Date: 23-04-2025 18:08:49
**(डॉ. संतोष चव्हाण)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर